


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. १० डिसेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०२६ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# शाळा - कॉलेज परिसरात ड्रग्ज, गुटखा विक्रेत्यांना 'मोका' लावणार

## कायद्यात बदल करणार; मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा, तंबाखू आणि अमली पदार्थ विकणाऱ्यांवर तसेच राज्यात गुटखा तस्करी आणि विक्री करणाऱ्याविरोधात आता 'मोका' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी कायद्यात बदल करून अशा प्रकरणांमध्ये 'मोका' लावण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.



आमदार प्रशांत ठाकूर, अस्लम शेख, अभिमन्यू पवार, रईस शेख, अमीन पटेल यांनी शाळा, महाविद्यालय परिसरात गुटखा विक्री आणि वाहतुकीसंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नास उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. ते म्हणाले, गुटखा विक्री करणाऱ्यांवर 'मोका' लागू करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मात्र, धमकी आणि इजा पोहोचविणे या दोन कृती या प्रकरणात घडत नसल्याने 'मोका' लावता येणार नसल्याचा अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिला. मोका कायद्यात संघटितपणे धमकी देणे तसेच सामूहिकरीत्या इजा पोहोचविणे या बाबी आवश्यक ठरतात. त्यामुळे या कायद्यातच बदल करत गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवरही 'मोका' लागू करता येईल, अशा दुरुस्त्या कायद्यात करण्याची सूचना केली आहे. या सुधारणांनंतर हा कायदा अधिक कठोर करण्यात होईल, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

विद्यमान कायदे कमकुवत असल्याने गुटखा तस्करी करणारे लगेच जामिनावर सुटतात. त्यामुळे कायद्यात सुधारणा करण्याचा मनोदय मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखविला.

राज्यात गुटखाबंदी आहे. गुटखा विक्री व वहनसंदर्भात राज्यभरात पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई केली आहे. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर मोहीम राबवली आहे. शाळा किंवा महाविद्यालयाच्या शंभर मीटर परिसरात गुटखा विक्रीचे प्रकार आढळल्यास त्या परिसरातील टपऱ्या किंवा दुकानांवर संयुक्त कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत. त्याचबरोबर ही कारवाई स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समन्वयाने केली जाणार आहे.

तसेच ड्रग्जच्या आहारी गेलेल्या व्यक्तींसाठी पुनर्वसन केंद्रांची आवश्यकता आहे. मुंबई महानगरमध्ये दर्जेदार पुनर्वसन केंद्रांची कमतरता असून शासन यासंदर्भात आवश्यक पुढाकार घेणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

### अनेक गुन्हे नोंदवले

राज्यभरात पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई केली असून विविध जिल्ह्यांमध्ये एकूण शेकडो गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यात नवी मुंबईत 1 हजार 144, अहिल्यानगर येथे 185, जालना 90, अकोला 35, नाशिक 131, चंद्रपूर 230, सोलापूर 108, बुलडाणा 664 तसेच नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांत 1 हजार 706 गुन्हे नोंदवण्यात आल्याची माहितीही फडणवीस यांनी दिली.

# ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव आमदारांसह भाजपच्या वाटेवर?



**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या विधानसभेत आदित्य ठाकरे यांना विरोधी पक्ष नेतेपदी नेमले जावे अशी मागणी शिवसेनेतील एका गटाने पुढे केली असल्याने नाराज झालेले भास्कर जाधव उबाठा गटात आधीच नाराज असलेल्या काही आमदारांसमवेत शिवसेनेतून बाहेर पडण्याची भीती व्यक्त केली जाते आहे. त्यामुळे नागपूर अधिवेशन आणि फोडाफोडी या समीकरणाची पुनरावृत्ती पुन्हा होईल काय असा प्रश्न राजकीय वर्तुळात केला जातो आहे.

मुंबई महानगरपालिकेतील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या या सरकारवरील घणाघाती आरोपांमुळे लोकप्रिय झालेल्या आणि शिवसैनिकांना आधार वाटणाऱ्या आदित्य ठाकरे यांना विरोधी पक्ष नेता नेमावे याबद्दल उद्धव ठाकरे यांच्या जवळच्या काही शिवसैनिकांनी हालचाली सुरू केल्या. त्यानंतर तसा प्रस्ताव विधिमंडळाकडे पाठवण्यात आला अशी जोरदार चर्चा आहे. भास्कर जाधव यांच्या विरोधी पक्ष नेतेपदावरील नियुक्तीला एकनाथ शिंदे गटाने विरोध केल्याने हे पद आदित्य यांना का देऊ नये असा विचार समोर आला आहे.

भास्कर जाधव यांच्यावर कोकणातील उबाठा नेते विनायक राऊत यांची आता मर्जी राहिलेली नाही. त्यामुळे ते भाजपच्या संपर्कात आहेत असे सांगण्यात येते. शिवाय भास्कर जाधव यांच्या वक्तव्यांची धार आदित्य यांच्या हल्ल्यापेक्षा एकसूरी आणि आक्रस्ताळी असल्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर आदित्य यांनाच या पदावर नेमणे उचित ठरेल अशी या गटाची भूमिका आहे.

शिवसेनेतील एका गटाने आदित्य ठाकरे यांचे नाव पुढे आलेले नाही हे सत्तापक्षाने पेरलेली चर्चा आहे याकडेही लक्ष वेधले आहे. काही दिवसांपासून विरोधी पक्षनेते पदाची नेमणूक प्रलंबित असून आता हा प्रश्न तसाच ठेवणे सरकारच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरेल अशीही चर्चा सत्ताधारी वर्तुळात सुरू आहे.दोन दिवसांपासून काही नव्या घडामोडी सुरु झाल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने विरोधी पक्षनेते पदाचा मुद्दा हा विधान परिषदेचे सभापती आणि विधानसभेचे अध्यक्ष यांच्या अखत्यारित येतो अशी भूमिका घेत असले तरी आजवर नेहमीच या पदावरील व्यक्ती नेमताना सत्ताधा-यांचे मत लक्षात घेतले जाते. मात्र या एकूणच हालचालीमुळे अस्वस्थ झालेले फायर ब्रँड भास्कर जाधव यांनी नाराज उबाठा आमदारांची मोट बांधणे सुरु केले असल्याचे समजते. काही नाराज आमदार त्यांच्या संपर्कात आहेत. कोकणात असे घडल्यास उबाठाला धक्का बसेल, शिंदे गट या घडामोडीकडे लक्ष ठेवून आहे.

# अनुसूचित जातीचे उपवर्गीय आरक्षण जाहीर करा : आ. अमित गोरखे




**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

'अनुसूचित जातीचे (एससी) उपवर्गीय आरक्षण जाहीर करा,' अशी मागणी विधान परिषद सदस्य अमित गोरखे यांनी मंगळवारी (दि.९) विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केली. महाराष्ट्रातील अनुसूचित जाती (एससी) प्रवर्ग हा एकसंध असला तरी प्रत्यक्षात तो ५९ विविध उपजातींचा विस्तृत आणि अनेक स्तरांनी बनलेला समाज आहे. गेल्या अनेक दशकांच्या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, काही निवडक उपजातींना नोकरी व शिक्षणातील आरक्षणाचा तुलनेने जास्त लाभ मिळाला. तर अनेक अत्यंत मागास उपजाती आजही प्रगतीच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. यामुळेच अ, ब, क, ड, या उपवर्गीकरणाचा उद्देश अगदी स्पष्ट आहे सर्वात हक्कदार आणि मागास घटकांना प्राधान्य मिळायला हवे.

## थोडक्यात...

### लाडक्या बहिणींना मधे आणू नका

नागपूर (समर्थ गांवकरी) : विधानसभेच्या सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपचे आमदार अभिमन्यू पवार यांना चांगलीच समज दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. वारंवार 'लाडक्या बहिणीं'चा उल्लेख केल्याने मुख्यमंत्री संतापले आणि त्यांनी आमदाराला थेट "घरी बसावे लागेल" अशा कडक शब्दांत सुनावले. भाजप आमदार अभिमन्यू पवार यांनी राज्यात मोठ्या प्रमाणावर सुरु असलेल्या अवैध दारू विक्रीच्या समस्येवर सभागृहात प्रश्न उपस्थित केला. यावेळी बोलताना त्यांनी सतत लाडक्या बहिणी असा उल्लेख केला. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चांगलेच भडकले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार अभिमन्यू पवार यांना कडक शब्दांत समज दिली. मुख्यमंत्र्यांनी "वारंवार लाडक्या बहिणींना प्रत्येक गोष्टीत आणू नका," अशा शब्दांत त्यांनी आमदाराला फटकारले. मुख्यमंत्री एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी अतिशय कठोर शब्दात बजावले की, "लाडक्या बहिणींना प्रत्येक प्रकरणाशी जोडू नका, नाहीतर घरी बसावे लागेल!"

### विरोधकांचे जोरदार आंदोलन

नागपूर (समर्थ गांवकरी) : नागपूरमध्ये सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारविरोधात जोरदार आंदोलन छेडले. विधानभवनाच्या पायऱ्यांवर उभे राहून "आमदार मोजतात पैसे, शेतकऱ्यांसाठी नाही पैसे!", "सातबारा कोरा करा नाहीतर खुर्च्या खाली करा!" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. विरोधकांनी गळ्यात कापसाच्या माळा घालून आंदोलन केले. कापूस आणि सोयाबीनला भाव नाही, कर्जमाफी मिळत नाही, शेतकऱ्यांची स्थिती बिकट झाली आहे, अशा मुद्द्यांवर त्यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले.

# प्राध्यापकांच्या पदोन्नतीसह कॅश-बेनिफिट प्रक्रियेला गती

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**



राज्यातील प्राध्यापक पदोन्नती आणि कॅश-बेनिफिट प्रक्रियेबाबत युजीसीच्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार गती देण्यात आली असून, याचा पात्र प्राध्यापकांना लाभ मिळेल, अशी ग्वाही उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी विधान परिषदेत दिली. स्कॉलरशिपचे अनुदान आता वेतन या बाबीमध्ये देण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप वेळेत मिळेल.

तसेच, भविष्यात शिक्षकेतर पदे भरण्यात येतील, असेही पाटील म्हणाले. सदस्य जयंत आसगावकर यांनी मांडलेल्या लक्षवेधी सुचनेला उत्तर देताना ते बोलत होते. पाटील म्हणाले, युजीसीच्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार पदोन्नती आणि कॅश-बेनिफिट संदर्भातील कार्यवाही केली जात आहे. या संदर्भातील माहिती विद्यापीठे आणि महाविद्यालयांकडून मागविण्यात आली आहे. यासाठी आवश्यक असणारा निधी शासनाकडून उपलब्ध होईल. विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी प्राध्यापक भरती प्रक्रिया गतीने राबविण्यात येणार आहे. युनिव्हर्सिटी कॅम्पसमध्ये 750 प्राध्यापक आणि सीनिअर महाविद्यालयांमध्ये सुमारे 5500 प्राध्यापक पदांची भरती केली जाणार आहे. तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ केली असून, विद्यापीठांना स्वनिधीतून ठोक 50 हजार वेतनावर प्राध्यापक घेण्यास अनुमती दिली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# एक्सप्रेस वेवर कारमध्ये नवविवाहित जोडप्यांचा रोमान्स; खासगी व्हिडीओ टोल मॅनेजरने रेकॉर्ड केला अन् नको नको ते केलं!

**------ : (समर्थ गांवकरी)**

उत्तर प्रदेशमधील पूर्वांचल एक्सप्रेसवेवरील टोल नाक्यावर जोडप्यांचा रोमान्स करतानाचा कारमधील व्हिडीओ समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे.
टोल प्लाझावरील एटीएमएसच्या व्यवस्थापक म्हणून काम करणाऱ्या आशुतोष सरकारने सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधून जोडप्याचे खासगी क्षणांचे व्हिडीओ फुटेज काढले आणि सोशल मीडियावर व्हायरल केल्याचं समोर आले आहे. सदर प्रकरणी आशुतोषवर कारवाई देखील करण्यात आली आहे. 25 ऑक्टोबर रोजी लखनौमधील एक नवविवाहित जोडपे उत्तर प्रदेशमधील पूर्वांचल एक्सप्रेसवेवर प्रवास करत होते. यादरम्यान, नवविवाहित जोडपे त्यांची कार थांबवून रोमान्स करत होते. त्यादरम्यान आशुतोषने त्यांचा व्हिडीओ बनवला आणि दुचाकीवरून त्यांच्यापर्यंत पोहोचला. आशुतोषने जोडप्यांना धमकी देऊन 32000 रुपये उकळले. पैसे घेतल्यानंतरही तो व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केला. आशुतोषने टोल प्लाझाच्या आसपासच्या तीन गावातील अनेक महिला आणि मुलींचे फुटेज बनवले आहेत आणि त्यांना ब्लॅकमेल केल्याचं प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. पोलिसांनी दाखल केलेल्या FIR मध्ये लिहिले आहे की, टोल प्लाझावर ATMS अंतर्गत ड्यटीवर असताना मॅनेजर आशुतोष सरकारने कॅमेऱ्याचा गैरवापर केला आणि त्याचा दुरुपयोग केला. एक्सप्रेस वे वर थांबून रोमान्स करणारे किंवा इंटिमेट होणारे जोडप्याचे खासगी व्हिडीओ आशुतोषने बेकायदेशीररित्या सिस्टीममधून काढले. एवढेच नाही, तर या व्हिडीओद्वारे तो संबंधित कपलकडून अवैध पैशांची मागणी करू लागला. पैसे दिल्यानंतरही त्याने हे खासगी व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केले. या अनैतिक कृत्यामुळे अनेक पीडितांचे आयुष्य धोक्यात आले. अखेरीस, 2 डिसेंबर रोजी काही पीडितांनी थेट मुख्यमंत्री कार्यालयाकडे तक्रार दाखल केली. प्रकरण तापताच, तातडीने कारवाई करत टोल व्यवस्थापनाने आरोपी आशुतोष सरकारला टर्मिनेट केले आहे.

# माझे नाव पुढे करणाऱ्याचा शोध घ्यावा लागेल

## व्हिडिओ प्रकरणी सरकारने चौकशी करावी : विजय वडेट्टीवार

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

नागपुरातील हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वीपासून विरोधी पक्षनेतेपदाचा मुद्दा तापलेला आहे. आज दुसऱ्या दिवशी काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार यांचे नाव विरोधी पक्षनेते म्हणून पुढे आले. या पार्श्वभूमीवर दस्तुरखुद्द वडेट्टीवार यांनी मात्र 'माझ्या नावासंदर्भात कुणीही माझ्याशी चर्चा केलेली नाही. माझे नाव कसे पुढे आले, याचा शोध घ्यावा लागेल,'असे वक्तव्य मंगळवारी (दि.९) विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलताना केले. अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून विरोधी पक्षनेतेपदासाठी वेगवेगळी नावे पुढे येत आहेत. सोमवारी आदित्य ठाकरे, भास्कर जाधव यांची नाव पुढे आली. आज, मंगळवारी विजय वडेट्टीवारांच्या नावाची चर्चा सुरू झाली. याबाबत त्यांना विचारले असता ते म्हणाले,'महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विधानसभेसाठी शिवसेनेचे भास्कर जाधव आणि विधान परिषदेसाठी काँग्रेसचे सतेज पाटील यांच्या नावाची शिफारस केली होती. दोन महिन्यांपूर्वी मुख्यमंत्र्यांशी भेटून विरोधी पक्षनेतेपद द्या, अशी मागणीही करण्यात आली होती. मात्र, माझ्या नावासंदर्भात कुणीही माझ्याशी चर्चा केलेली नाही. त्यामुळे माझे नाव पुढे कसे आले, याचा शोध घ्यावा लागेल.' तसेच भाजपला वडेट्टीवार विरोधी पक्षनेते म्हणून चालतात यासंदर्भात मला मुख्यमंत्र्यांनाच विचारावे लागेल, असा टोला देखील लगावला.




दरम्यान, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते अंबादास दानवे यांनी एक्सवर व्हिडीओ पोस्ट केला आहे. यात एक आमदार पैशांच्या गड्डयांसह दिसत असून तो आमदार कोण, असा सवाल दानवे यांनी केला आहे.

